औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या शुक्रवार दिनांक ३१/३/८९ रोजी सायंकाळी ५ वाजता झालेल्या ३६ व्या सभेचा कार्यवृत्तांत. [३]

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१] श्री. ईश्वर भोसीकर — सभापती औरंगाबाद मंडळ

२] श्री. अ. म. महाजन — उपसभापती औरंगाबाद मंडळ

३] श्री. गोविंद स्वरुप — सभासद
आयुक्त औरंगाबाद विभाग

४] श्री. द. मो. गोडघाटे — सभासद
उपसंचालक, नगररचना

५] श्री. धारुरकर कार्यकारी अभियंता हे आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.

विषय क्र. १:- मंडळाच्या दिनांक २८/२/८९ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १५४

मंडळाच्या दिनांक २८/२/८९ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांस मान्यता देण्यांत आली व तो कायम करण्यांत आला.

विषय क्र. २:- सिडको क्षेत्रातील मंडळाच्या वसाहतीमधील अपूर्ण सुविधा पूर्ण करणे.

ठराव क्र. १५५:-

वरील विषयाबाबत उपसभापती यांनी सर्व सदस्यांना मंडळाच्या नविन औरंगाबादेतील वसाहतीच्या [अविष्कार कॉलनीतील] समस्याबाबत सविस्तर माहिती दिली व त्यावर सविस्तर चर्चा होऊन खाली नमुद केलेली बाहयसुविधांची कामे उपलब्ध अपेक्षित दायित्वाच्या रकमेतून ( Anticipate Liability ) त्वरीत हाती घेण्यांत यावी असा निर्णय मंडळाने घेतला.

[अ] वसाहतीमध्ये विजेच्या दिव्याचे खांब उभारलेले आहेत. त्यावर सध्या ४० टयुब लाईटस बसविण्यासाठी अंदाजे रु. २५,०००/- खर्चास मंजूरी दिली.

[ब] या वसाहतीत पाणीपुरवठा करणारी लहान व्यासाची पाईप लाईन टाकलेली आहे. त्याऐवजी ८० एम. एम. व्यासाची पाईप लाईन २३५ रनिंग मिटर टाकण्याकरिता रु. २०,००० खर्चास मंजूरी प्रदान केली.

. . . . . २

[क] : --

वसाहतीमध्ये मध्यम व अल्प उ. गट योजनेतील घराच्या मागील बाजूस सामाईक सरहद्दीवरुन १५० मि. मी व्यासाची भूमिगत गटाराची लाईन टाकलेली आहे. सदर लाईन वारंवार बंद होऊन घाण पाणी तुंबते व गाळेधारकांच्या आरोग्यास धोका होण्याची शक्यता आहे. त्याकरिता ही लाईन अंदाजीत ७० मी. बदलण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास रु. १५००० मंडळाच्या सर्व सदस्यांनी सर्वानुमते मंजूरी दिली आहे.

[ड] या वसाहतीमधील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी व खड्डे भरण्यासाठी अंदाजे रु. २२००० खर्चास मंडळाने मंजूरी दिली.

म्हणजे अ, ब, क, ड या एकुण कामाकरिता लागणाऱ्या रु. ८२,००० खर्चास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ३: नाशिक येथील मे. धार सिमेंट लि. ह्या सिमेंट पुरवठादाराने मंडळाविरुध्द न्यायालयातून सिमेंट खरेदीवर आणलेला स्थगिती आदेश व त्यामुळे उद्भवलेली परिस्थिती.

ठराव क्र. १५६

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, मे. धार सिमेंट लि. ह्या सिमेंट पुरवठादाराने मंडळाविरुध्द न्यायालयातून सिमेंट खरेदी निविदाबाबत आणलेला स्थगिती आदेश लवकरात लवकर उठविण्याकरिता आवश्यकतर खाजगी तज्ञ वकीलाची मदत घ्यावी व स्थगिती आदेश त्वरीत उठविण्याचा प्रयत्न करावा. स्थगिती आदेश लवकर उठणे शक्य नसल्यास सी. सी. आय या केंद्र शासनाच्या अंगीकृत कंपनीकडून सिमेंट खरेदी करण्यांत यावी.

विषय क्र. ४: औरंगाबाद शहरामध्ये भूसंपादनाचे नविन प्रस्ताव तयार करणे.

ठराव क्र. १५७

भूसंपादनाच्या विषयावर चर्चा करतांना श्री. द. मो. गोडघाटे यांनी असे सुचविले की, भूसंपादनाचे प्रस्ताव व्यवस्थीत बघून नंतरच पुढील कार्यवाही करावी. व पडेगांव, हरसूल, बनेवाडी येथील भूसंपादनाचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव पाठवावे व नक्षत्रवाडी व सातारा येथील प्रस्ताव जमिनीची पाहणी झाल्यानंतरच पाठवावे. तसेच २१६, २१७, २०८, २०५, २२१ या शासकीय जमिनीची पाहणी करुन संपादनाची कार्यवाही करावी असे श्री. गोडघाटे यांनी सुचविले.

मा. आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी अशी सूचना केली की, प्रथम शासकीय व सोयीस्कर अशया जमिनी संपादन कराव्यात. तसेच सभेमध्ये असे सांगण्यांत आले की, मंडळाने सिडकोकडे जमिनीसाठी रु. १ कोटी तीन लाख भरलेले आहे. परंतू सिडकोने मंडळाला केवळ २४.५२ हेक्टर जमिन दिली आहे. अजापी सिडकोकडे रु. ६०.७२ लेक्षांची बाकी आहेत यावर मा. आयुक्तांनी सूचना केली की, माझ्याकडे एक टिप्पणी तयार करुन जावी. तसेच मा. सभापतींनीही अशयाच प्रकारची एक टिप्पणी सिडकोचे कार्यकारी संचालक श्री. नलीनाक्षन व मा. ना. श्री. रामराव आदीक यांच्याकडे देण्यासाठी तयार करुन जावी अशी सूचना केली.

विषय क्र.५:- विडीकामगारांसाठी औरंगाबाद, जालना, नांदेड आणि नासिक हया ठिकाणी घेतलेल्या गृहनिर्माण योजना व अनुदान मिळण्यामध्ये होणारा विलंब.

ठराव क्र. १५८

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना मा. सभापतींनी असे सुचविले की, विडी कामगारांच्या गृहनिर्माण योजनेस अनुदान मिळण्याबाबत केंद्रीय अर्थमंत्री मा. ना. श्री. शंकरराव चव्हाण यांना एक पत्र लिहून अनुदानाची मागणी करावी आणि सध्याच अर्जदारांकडून अनुदानाच्या रु. ५०००/- रकमेची मागणी करु नये.

विषय क्र. ६: औरंगाबाद मंडळाच्या एन-६ भाग-२ सिडको औरंगाबाद हया विकसित वसाहतीतील सुविधा भूखंडाचे वाटप करण्याबाबत.

ठराव क्र. १५९

या विषयावर चर्चा करतांना असे ठरले की, प्रत्यक्ष जागेची पाहणी केल्यानंतर तिच्या उपयुक्ततेबाबत निर्णय घेऊन नंतरच जाहिरात जावी.

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळचा विषय.

[१] विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज बाबत मा. सभापतींनी विषय चर्चेला घेतला.

ठराव क्र. १६०

मंडळाकडे वाळूज क्षेत्रातील ब-याच संस्थांचे आणि हितसंबंधीयांचे " ना हरकत प्रमाणपत्र " देण्याबाबत विचारणा होत आहे. याबाबत मंडळाने

त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्याबाबत चर्चा करण्यांत आली. चर्चेअंती असे ठरले की, वाळूज क्षेत्राचा रचनात्मक आराखडा हा लवकरात लवकर म्हणजे सन १९८९ पर्यन्त तयार करण्यांत यावा म्हणजे त्यानुसार ना हरकत प्रमाणपत्राबाबत कार्यवाही करता येईल. त्यावेळी सहाय्यक संचालक नगररचना [वाळूज] यांनी मंडळाच्या असे निदर्शनास आणले की, मार्च १९८९ पर्यन्त ६००० हेक्टर जमिनीपैकी ९१३ हेक्टर . जमिनीचा सर्व्हे करावयाचा होता. तो पूर्ण झालेला आहे. राहिलेले अंदाजे ५००० हे. जमिनीचा सर्व्हे त्वरीत सुरु करणे आवश्यक आहे. म्हणजे पूर्ण क्षेत्राचा " सध्याच्या जमिनीच्या उपयोगाचा नकाशा [ Existing land use map ] तयार करून रचनात्मक आराखडा जुन ८९ पर्यन्त तयार करणे शक्य होईल. त्यावर विभागीय आयुक्त यांनी असे सुचविले की, पुढील बाकी जमीनीचे सर्व्हे करण्याचे काम चालु ठेवावे आणि याबाबत ते उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्याशी बोलतील. वरील प्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरविण्यांत आले.

[२] असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणेबाबत.

ठराव क्र. १६१
----------

या विषयावर चर्चा होऊन श्री. एस. डी. पांडे उप अभियंता यांनी असाधारण परिस्थितीत त्यांच्या मुलीच्या आजारपणासाठी केलेल्या खर्चाच्या ८०% म्हणजे रु. १३७४/- च्या प्रतिपूर्तीस सदर वैद्यक प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे तपासून प्रतिपूर्ती देण्याच्या अटीवर मंजूरी देण्यांत आली.

तसेच वरिष्ठ लिपिक श्री. एस. बी. त्रिभुवन यांनी असाधारण परिस्थितीत स्वत:च्या आजारपणासाठी रु. ४६७०/- खर्च केलेला आहे. या रकमेपैकी औषधापोटी झालेला खर्च रु. १९५०/- मधून रु. १०३१ मंजूर न करण्याचे सिव्हील सर्जन औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ३. ३. ८९ च्या पत्रान्वये कळविले आहे. आणि उर्वरीत खर्चाच्या ९० टक्के व इन्डोर चार्जेस नियमाप्रमाणे असे एकुण २२५९ रु. च्या प्रतिपूर्तीस सदर वैद्यक प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे तपासून प्रतीपूर्ती देण्याच्या अटीवर मंजूरी दिली.

[३] गलिच्छवस्ती सुधारणा कार्यक्रमातील ८८-८९ या चालु आर्थिक वर्षाची तरतुद यावर्षासाठी मंजूर केलेल्या कामावर पूर्ण खर्च होऊ न शकल्यास पुढील आर्थिक वर्षात परतफेड करावयाच्या योजनेवरील खर्चाची ८८-८९ वर्षातील तरतुदीतून परतफेड करणे.

ठराव क्र. १६२

जालना तसेच नासिक नगरपरिषदेने तरतुदीच्या रकमेच्या दुप्पट रकमेइतकी प्रशासकीय मान्यता प्राप्त कामे असुनही तरतुदी इतका खर्च केलेला नाही. त्यामुळे ८९-९० सालामध्ये उपलब्ध तरतुदीनुसार प्रतिपुर्ती करण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची देयके प्राप्त झाल्यास चालु आर्थिक वर्षाची तरतुद व्यपगत होऊ नये म्हणुन चालु वर्षी उपलब्ध तरतुदीतून प्रतिपूर्ती करणेबाबत विचार करण्यांत आला व जालना येथील कन्हैयानगर व नासिक येथील एकलहरा गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमावर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती ८८-८९ या आर्थिक वर्षाच्या उपलब्ध तरतुदीतून करण्यास मान्यता देण्यांत आली.

. . . .